प्रेस नोट ता. १३/०४/२०२३

# आयपीएल क्रिकेट मॅचवर सट्टा घेणा-या बुकींवर छापा

# पाच बुकींना अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

आयपीएल क्रिकेट मॅचवर काही इसम सट्टा लावुन जुगार चालवित असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने त्यावर मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते. पिंपरी-चिंचवड परिसरात कारवाई करीत असतांना दिनांक ११/४/२०२३ रोजी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम गुन्हे शाखा युनिट २ यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी मुंबई इंडीयन्स विरुध्द दिल्ली कॅपीटल या संघामध्ये सुरु असलेल्या क्रिकेट मॅचवर काही इसम चिंचवड मधील उच्चभ्रु सोसायटीत बंद फ्लॅटमध्ये सट्टा घेत असलेची खात्रीशीर बातमी मिळालेने गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक गणेश माने व पोलीस अंमलदार जयवंत राऊत, प्रमोद वेताळ, देवा राऊत, सागर अवसरे यांचे पथकाने मेट्रोपोलीटीन सोसायटी चिंचवडगांव येथे सापळा लावला. बिल्डींगच्या सहाव्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ६०२ मध्ये क्रिकेट मॅचवर सट्टा घेत असल्याची खात्री होताच छापा मारुन त्या ठिकाणी एकूण ५ बुकींना ताब्यात घेतले. त्यांची नावे – १) गोविंद प्रभुदास लालवानी वय ४५ वर्षे २) कन्हैयालाल सुगुणुमल हरजानी वय ६१ वर्षे ३) देवानंद प्रतापराय दरयानी वय ५१ वर्षे ४) रमेश दयाराम मिरानी वय ६३ वर्षे ५) हरेश हनुमंत थटाई वय ५८ वर्षे सर्व राहणार पिंपरी पुणे अशी आहेत.

छापा कारवाईमध्ये १४ मोबाईल, ०१ लॅपटॉप, ०२ वायफाय, ०२ कॅल्युलेटर, जुगाराची साधने व रोख रक्कम असा सुमारे एक लाख रुपये किंमतीचा मुदेमाल मिळुन आला. ताब्यात घेण्यात आलेले बुकी यांचे मोबाईल मध्ये ताज ७७७ नावाच्या ॲपवर टिव्हीवरील प्रक्षेपणापुर्वी एक बॉल अगोदर दिसते याचा फायदा घेवून क्रिकेट सामन्यावर लोकांकडून ऑनलाईन सट्टा घेत होते. सदर इसमांनी आयपीएल क्रिकेट सामन्यावर बेकायदेशीर सट्टा घेवून बेहिशोबी आर्थीक उलाढाल करुन शासनाची फसवणुक केली व अवैधरित्या जुगार चालविल्याने महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये कायदेशीर कारवाई करुन चिंचवड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाची व्याप्ती मोठी असुन महाराष्ट्र राज्यातील व राज्याच्या बाहेरील बुकींची साखळी असण्याची शक्यता असल्याने गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा युनिट २ कडून सुरु असुन पोलीस उप निरीक्षक गणेश माने अधिक तपास करीत आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री मनोज लोहीया, अप्पर पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे डॉ. प्रशांत अमृतकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक गणेश माने ,गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार जयवंत राऊत, प्रमोद वेताळ, देवा राऊत, सागर अवसरे यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड